
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ७४
www.ramprahar.com
बुधवार, १ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राज्यात भू-करमापक संवर्गातील पदांची होणार भरती



**पुणे** : भूमी अभिलेख विभागातील 'गट क' भू-करमापक संवर्गातील ९०३ रिक्त पदे भरण्यासाठी परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून १ ते २४ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात भू-करमापक संवर्गातील एकूण एक हजार १६० पदे रिक्त असून त्यापैकी ९०३ पदे सरळसेवेने भरण्यात येणार आहेत. यामध्ये पुणे विभागातील ८३ पदे, कोकण (मुंबई) विभाग २५९, नाशिक १२४, छत्रपती संभाजीनगर २१०, अमरावती ११७ आणि नागपूर विभागातील ११० पदांचा समावेश आहे. उमेदवारांचे अर्ज https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ आणि https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळांवर ऑनलाईन स्वीकारण्यात येणार असून भरतीसाठी १३ व १४ नोव्हेंबर रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे.

### अंतरंग

'दिबां'च्या नावासाठी लढा सुरू असताना बाळ्यामामा कुठे होते?/३
सेवा पंधरवड्यातंर्गत नागरिकांसाठी शिबिर/६
हिंदवी म्हस्केला राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक/८



# लस निर्मितीसाठी हाफकिनला २५ कोटींचा निधी

**मुंबई : प्रतिनिधी**

लस निर्मितीच्या क्षेत्रात हाफकिन संस्थेचं मोलाचं योगदान असून देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकरातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आणि संस्थेतील निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर,विधान परिषद सदस्य सचिन अहिर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर,विधी व न्याय विभागाच्या सहसचिव अश्विनी सैनी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे उपस्थित होते.

हाफकिन इन्स्टिटच्यूट आणि हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सक्षमीकरण करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. या समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि नियोजन विभागाच्या सचिवांचा समावेश करावा. या समितीने हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी पाच वर्षांचा रोडमॅप तयार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

सध्या हाफकिनकडे सर्पदंशावरील दीड लाख लस तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकिनने तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हाफकिनमार्फत करावी यावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री पवार यांनी या वेळी दिले.

# चांगल्या कामाची दखल समाज घेतोच : यजुर्वेंद्र महाजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

माणूस म्हणून जन्माला आलाच आहात तर मानवतेचा धर्म पाळा. कुणाला तरी उपयोगी पडेल असे चांगले काम करा. पैसे नाहीत म्हणून चांगले काम थांबवू नका. निस्वार्थीपणे केलेल्या चांगल्या कामाची दखल समाज घेतोच. समाजात तुमच्या कामाबद्दल विश्वास निर्माण झाला की तुम्ही करत असलेल्या कामासाठी मदतीचे हात पुढे येतात, असे प्रतिपादन जळगाव येथील दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुर्वेद्र महाजन यांनी केले.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे प्रेरणादायी व्याख्यानमाला सुरु करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेतील पहिले पुष्प यजुर्वेद महाजन यांनी शनिवारी (दि. २७) गुंफले . आदर्श भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या या व्याख्यानमालेत 'जीना इसीका नाम है' या विषयावर यजुर्वेद्र महाजन यांनी आपले विचार व्यक्त केले.

माणासाने चागंले काम केले पाहिजे. चांगल्या कामासाठी चागंल्या माणसांनी एकत्र यायला हवे. चांगल्या माणसांनी एकत्र येऊन चागंले काम केले नाही तर इतरांची शक्ती वाढेल. चांगली माणसे स्वस्थ बसल्यामुळे समाजाचे नुकसान होते, असे यजुर्वेंद्र महाजन म्हणाले.

जे बनायच ठरवाल तेच तुम्ही बनाल इतकी ताकद तुमच्यात आहे. त्यामुळे काय करायचे ते ठरवा. एक ध्येय्य निश्चित करा. त्याला अपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनवा. रचनात्मक कार्य करा , त्यासाठी नियोजन करा. चांगले काम करा चांगल्या कामाचे चांगले फळ मिळतेच, असे यजुर्वेंद्र महाजन म्हणाले.

आपल्या व्याख्यानात दीपस्तंभ फाऊंडेशन दिव्यांग, अनाथ व ट्रान्सजेंडर मुलांसाठी करत असलेल्या कामाची माहिती त्यांनी दिली. रायगडमधील ज्या दिव्यांग व अनाथ मुलांना शैक्षणिक मदत हवी असेल त्यांना दीपस्तंभतर्फे मदत करू असे आश्वासन यजुर्वेंद्र महाजन यांनी यावेळी दिले.

पतसंस्था चालवणे सोपे नाही. आदर्श नागरी पतसंस्था आपल्या नावा प्रमाणे काम करत आहे. त्यामुळेच आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेवर ग्राहकांचा विश्वास आहे, असे प्रशंसोउदगार यजुर्वेंद्र महाजन यांनी काढले.

यावेळी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, संचालक सतीश प्रधान, महेश चव्हाण, संजय राऊत, ॲड. वर्षा शेठ, श्रीकांत ओसवाल, ॲड. रेश्मा पाटील, विलाप सरतांडेल डॉ. मकरंद आठवले, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.



# सीकेटी विद्यालयात इंग्रजी आणि गणित मॅरेथॉन स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संकुलात यंदाचे वर्ष हे अतिशय उत्साहवर्धक ठरले आहे. संस्थेचे चेअरमन माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पंचाहतराव्या वाढदिवसाचे औचित्य साधून संपूर्ण वर्षभर वेगवेगळे कार्यक्रम साजरे केले जाणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मंगळवार ३० सप्टेंबर रोजी सी के टी इंग्रजी माध्यमिक विभागाने विद्यार्थ्यासाठी इंग्रजी व गणित विषय मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केल्या होत्या.



या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उप महापौर चारुशीलाताई घरत, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य राहुल घरत, वैशाली पाटील, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी उपस्थित होते.

स्पर्धेचे नियोजन हे पनवेल परिसरातील सर्व माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थ्यासाठी करण्यात आले होते. या स्पर्धेत परिसरातील सुमारे २० शाळा सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक शाळेतून प्रत्येकी २ स्पर्धक निवडण्यात आले. इंग्रजी आणि गणित या दोन्ही विषयासाठी ८० विद्यार्थी सहभागी झाले होते.

# स्वच्छता ही सेवा अंतर्गत पनवेल मनपा शाळांमध्ये स्वच्छताविषयक चित्रकला स्पर्धा आणि सायकल रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता ही सेवा २०२५' अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागातील २३ शाळांमध्ये स्वच्छोत्सव २०२५ अंतर्गत स्वच्छता जनजागृतीसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे तसेच समाजात स्वच्छतेचे महत्व अधोरेखित करणे हा होता. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत–सुंदर भारत, आपले शहर आपली जबाबदारी व स्वच्छतेतून आरोग्य अशा विषयांवर आकर्षक व संदेशप्रधान चित्रे साकारली.या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना लहानपणापासून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देऊन त्यांना स्वच्छतेचे दूत बनविण्याचा प्रयत्न पनवेल महानगरपालिकेमार्फत करण्यात आला असल्याचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले.

स्वच्छोत्सव २०२५ सायकल रॅली

स्वच्छतेचा संदेश देण्याच्यादृष्टीने नागरिक आणि विद्यार्थी यांच्या सहभागातून २८ सप्टेंबर रोजी सकाळी वडाळे तलाव येथे सायकल रॅली काढण्यात आली. ही सायकल रॅली वडाळे तलाव येथून सुरुवात होऊन सावरकर चौक, श्रेयश बिल्डिंग वडाळे तलाव गार्डन हॉटेल, किया कामोठे पोलीस स्टेशन, मानसरोवर उड्डाणपूल, कोपरा टोल प्लाझा, थ्री मंकी पॉइंट, उत्सव चौक, सेंट्रल पार्क, खारघर गुरुद्वारा, श्री स्वयंभू गणेश मंदिर, सेंट्रल पार्क सर्कल, शिल्प चौक ते पुन्हा वडाळा तलाव अशा मार्गाने काढण्यात आली.

या सायकल रॅलीमध्ये पनवेल सायकलिंग क्लब, रणथॉन सायकलिंग ग्रुप न्यू पनवेल, पनवेल रायडर्स ,कामोठे कलांबोली सायकलिंग क्लब, वांडरर्स सायकल,इंडियन नेव्ही,इंडियन रेल्वे, इन्सत्राटा मुंबई, पेडल वॉरियर, शाहिल सायकलिंग, अनुभव सायकल ग्रुप,तानाजी रायडर्स, बॅकबोन सायकलिंग फिट भारत क्लब, पनवेल महानगरपालिका सायकलिस्ट, डेकॅथलॉन बेलापूर, निसर्गमित्र पनवेल, भुक्कड सायकलिंग ग्रुप खारघर, बोन्झर स्पोर्ट्स कामोठे असे १९ सायकलिंग क्लब सहभागी झाले होते.

# नेरळ स्टेशनमध्ये अजब कारभार! महिला स्वच्छतागृह सायंकाळी बंद

**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कर्जतजवळील नेरळ (जंक्शन) स्थानकावर प्रवाशांची रोजची गैरसोय संपायचे नाव घेत नाही. स्थानकाचा कायापालट दाखवून रेल्वे अधिकारी श्रेय घेत असले तरी प्रत्यक्षात प्रवाशांच्या मूलभूत सोयींकडे घोर दुर्लक्ष केले जात आहे. येथील महिला स्वच्छतागृह सायंकाळी पाचनंतर कुलूप लावून बंद केले जाते हा अजब कारभार याचे ठळक उदाहरण आहे.फलाट क्रमांक दोनवर असलेले हे एकमेव स्वच्छतागृह बंद झाल्याने स्थानकावरून प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांना प्रचंड कुचंबणा सहन करावी लागत आहे.



कर्जत तालुक्यातील एकमेव नेरळ जॅक्सन रेल्वे स्थानक हे माथेरान सारख्या जगप्रसिद्ध पर्यटन स्थळाला जोडले गेलेले महत्वाचे स्थानक आहे.याच स्थानकाला लागून माथेरान मिनी ट्रेनचे रेल्वे स्थानक आहे.दरम्यान नेरळ रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर असलेले स्वच्छता गृह सायंकाळी बंद होत असल्याने नोकरदार महिला दिवसभरानंतर ट्रेन पकडण्यासाठी धावत येतात, पण स्वच्छतागृह बंद असल्याने त्यांची मोठी गैरसोय होते.फक्त महिला प्रवासीच नव्हे, तर रात्री मुंबईकडे भाजीपाला विक्रीसाठी जाणारे आदिवासी महिला भगिनीही याच समस्येमुळे अडचणीत सापडतात. रेल्वे अधिकाऱ्यांचा धाक असल्याने कोणीही तक्रार करण्यास पुढे येत नाही.

याहून धक्कादायक म्हणजे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ माथेरान येथे जाण्यासाठी हजारो पर्यटक दररोज नेरळ स्थानकात उतरतात. परंतु, स्वच्छतागृह बंद असल्याने या पर्यटकांचीही मोठी गैरसोय होत आहे. दिवसभर माथेरानची सफर करून संध्याकाळी परतताना महिलांसह पर्यटकांना स्वच्छतागृह बंद असल्याचा फटका बसतो.

स्थानिक प्रवाशांचे म्हणणे आहे की, स्वच्छतागृहाची साफसफाईही होत नाही, जागोजागी घाण दिसते. त्यातच हे स्वच्छतागृह मुंबईकडे जाणाऱ्या गाड्यांच्या दुसऱ्या डब्याजवळ असल्याने प्रवाशांना खूप चालत जावे लागते. अनेकदा ट्रेन सुटण्याच्या वेळेस ही परिस्थिती अधिकच त्रासदायक ठरते. दरम्यान, प्रशासन मात्र या गंभीर प्रश्नावर मौन बाळगून आहे. पर्यटकांसमोर भारताच्या प्रतिमेलाही धक्का बसतो आहे.

# आदिवासी, कोळी बांधवांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**अलिबाग : प्रतिनिधी**

घटनेतील तरतूदींनुसार अनुसचीत जमातींमध्ये ज्या जाती व जमातींचा समवेश आहे त्यांनाच अनुसूचित जमातींचे आरक्षण द्यावे. अन्य जाती व जमातींचा यात समावेश करू नये या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील आदिवासी, कोळी बांधवांनी मंगळवारी (दि. ९) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. जिल्हाधिकारी यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी ते स्वीकारले.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती दिलीप भोईर, रायगड जिल्हा कातकरी समाज अध्यक्ष भगवान नाईक, आदिवासी कोळी विभागीय अध्यक्ष जलदीप तांडेल, मुकेश नाईक, धर्मा लोगे, कृष्णा पिंगळा, मोरेश्वर हाडके, गजानन पाटील, रवींद्र वाघमारे, भरत पाटील, दत्ता नाईक, सुरेश नाईक, पांडुरंग वाघमारे, चिंतामणी मकू आदी या मोर्चात सहभागी झाले होते.राज्यातील धनगर आणि बंजारा समाजाने अनुसूचित जमातीसाठी असलेल्या आरक्षणात हक्क सांगण्यास सुरूवात केली आहे. त्यांचा अनुसूचित जमातीं समावेश करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.




**महाराष्ट्र शासन**
**भूमि अभिलेख विभाग**

महसुल व वन विभागाकडील शासन मान्यता पत्र क्रमांकः ससेभ ०८२५/प्र.क्र. २७४/ आस्था–०६, दिनांक २१/०८/२०२५ नुसार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे व उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश, मुंबई यांचे अधिपत्याखालील विविध कार्यालयातील खालील रिक्त पदे भरण्याकरीता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी विहीत अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. भरावयाच्या पदांचा तपशील विभाग – कोंकण प्रदेश मुंबई. पदाचे नाव व वेतनश्रेणी – भूकरमापक वेतन स्तर एस–६ (रु. १९९००–६३२००)

| अ. क्र | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ८ | २६ |
| | अनु. जमाती | २ | १ | ० | ४ | १ | १ | ४ | १३ |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | २ | ० | १ | ३ | ७ |
| | भ.ज. ब | १ | ० | ० | २ | ० | १ | २ | ६ |
| | भ.ज. क. | १ | ० | ० | २ | ० | १ | २ | ६ |
| | भ.ज. ड | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | ५ |
| | वि.मा.प्र. | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| | इ.मा.व. | ७ | २ | १ | १५ | २ | ५ | १७ | ४९ |
| | एस.ई.बी.सी. | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | ८ | २६ |
| | ईडब्ल्यूएस | ६ | २ | १ | ११ | २ | ४ | १२ | ३८ |
| | अराखीव | १२ | ४ | २ | २४ | ४ | ८ | २५ | ७९ |
| | **एकूण** | **४०** | **११** | **६** | **७९** | **११** | **२८** | **८४** | **२५९** |
| | दिव्यांगाकरीता राखीव – एकुण १० (अल्पदृष्टी ३, श्रवणदोष ३, अस्थीव्यंग २, स्वमग्नता/मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग–२) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव– एकूण ०३ (संस्थास्थाबाह्य–१ ) | | | | | | | | |

**२. विहित शैक्षणिक अर्हताः**

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दिनांक २४/१०/२०२५) रोजी धारण केलेली असावी.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | अर्हता / अनुभव |
|---|---|---|
| १ | भूकरमापक | १) मान्यता प्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यता प्राप्त संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केल्यावर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षांचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र,** <br> २) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र. <br> उपरोक्त क्र. (२) मध्ये नमुद टंकलेखन विषयक अर्हता पूर्ण करत नसलेली व्यक्ती सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल. परंतु, अशा व्यक्तीने सदर अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर अर्हता धारण न केल्यास तो/ती सेवा समाप्तीस पात्र राहील. |

**** केंद्र शासनाच्या मा. महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण क्र. DGET–१९/०६(१)/ २०१४–CD, दिनांक ०४ जुलै २०१४ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकवला जाणाऱ्या सर्व्हेअर अभ्यासक्रमाचा कालावधी प्रवेश सत्र ऑगस्ट २०१४ पासून एक वर्ष कालावधीचा झालेला आहे. त्यानुसार अभ्यासक्रम पूर्ण करुन त्याबाबतचे वैध प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार वरील पदाकरीता अर्ज करण्यास तसेच परिक्षेस बसण्यास पात्र असतील, मात्र त्याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील आदेशानुसार त्यांचे निवडीबाबत कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत शासनाकडील निर्णय अंतिम राहील.**

**३. वेळापत्रक –**

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दिनांक ०१/१०/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २४/१०/२०२५ रात्री २३.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक ०१/१०/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २४/१०/२०२५ रात्री २३.५९ पर्यंत |
| ३ | परीक्षेचा प्रस्तावित दिनांक | १३ व १४ नोव्हेंबर, २०२५ *** |

***** नियोजनच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल होवू शकतो.**

प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भात संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबत सविस्तर तपशीलासाठी विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहीरातीचे अवलोकन करावे.

ऑनलाईन अर्ज वरील संकेतस्थळावर दिनांक ०१/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ पर्यंत स्विकारण्यात येतील.

विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ d https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**सही/–**
**डॉ. सुनिल राऊत**
**सदस्य सचिव, गट क निवड समिती तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश, मुंबई**

**आरओसी – २०२५–२६/क्र.–५/सी२८४०**

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ७४
www.ramprahar.com
राम प्रहर
बुधवार, १ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ऑक्टोबर महिन्यातही पाऊस पडण्याचा हवामान खात्याचा अंदाज



**पुणे** : सप्टेंबर महिन्यात सुरू झालेल्या परतीच्या पावसामुळे देशातील अनेक भागात मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाली होती. महाराष्ट्रातील मराठवाड्यासह इतर ठिकाणी मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे पिकांसह मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य लोक संकटात सापडले आहेत. अशात आता ऑक्टोबर महिन्यात संपूर्ण भारतात मुसळधार पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. आयएमडीचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, ऑक्टोबर महिन्यात सरासरीपेक्षा ११५ टक्के अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. एवढेच नाही तर या पावसामुळे गेल्या ५० वर्षांतील रेकॉर्ड तुटू शकतो. सर्वसाधारणपणे सप्टेंबर महिन्यात मान्सूनची तीव्रता कमी होते, मात्र या वेळी मान्सून अधिक सक्रिय राहिला तसेच अजूनही काही भागात आर्द्रता आहे. त्या आर्द्रतेमुळे ऑक्टोबर महिन्यात पाऊस पडण्याची शक्यता आहे, असेही आयएमडीचे संचालक महापात्रा यांनी म्हटले आहे.

# ‘दिबां’च्या नावासाठी लढा सुरू असताना बाळ्यामामा म्हात्रे कुठे होते?

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा खडा सवाल

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

लोकनेते स्व.दि.बा. पाटीलसाहेब प्रकल्पग्रस्त, स्थानिकांचे दैवत आहेत. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला त्यांचे नाव द्यावे या भावनेतून गेल्या अनेक वर्षांपासून सर्वपक्षीय लढा उभारण्यात आला आहे. लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने गेल्या पाच वर्षांत असंख्य आंदोलने, मोर्चे, शेकडो बैठका झाल्या आहेत. रायगड, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, डोंबिवली अशा विविध ठिकाणांहून लाखो भूमिपुत्रांनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या लढ्याला जनतेचा व्यापक पाठिंबा असताना अचानक खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांची घुसखोरी सुरू झाली आहे, मात्र हा लढा सुरू असताना बाळ्यामामा म्हात्रे कुठे होते, असा सवाल सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि.३०) मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत उपस्थित केला.



सुरेश म्हात्रे आमच्या विभागाचे खासदार नाहीत, त्यामुळे त्यांना या लढ्याचे महत्त्व व इतिहास माहीत नाही. फक्त श्रेय घेण्यासाठी आणि शो शायनिंगसाठी ते पुढे येत आहेत, अशी टीकाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केली.

प्रकल्पग्रस्त आणि समितीला विश्वासात न घेता स्वतःच्या मनमर्जीने खासदार बाळ्यामामा म्हात्रे दिखाऊगिरी व दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचा खरपूस समाचार घेत ‘दिबा’साहेबांचेच नाव मिळाले पाहिजे ही आमची आग्रही भूमिका आहे आणि त्यासाठी समिती दक्ष असल्याचेही अधोरेखित केले. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेला त्यांच्यासमवेत भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख उपस्थित होते.

या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हटले की, बाळ्यामामा म्हात्रे यांनी ६ ऑक्टोबरला मोर्चा काढण्याची घोषणा केली असली तरी त्या संदर्भातील बैठकीला लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचा कुणीही पदाधिकारी उपस्थित नव्हता. विशेष म्हणजे त्या बैठकीला मीदेखील उपस्थित नसताना माझ्या नावाचा उल्लेख वर्तमानपत्रात करण्यात आला. भूमिपुत्रांना फसविण्याचा केविलवाणा प्रयत्न होऊ नये. समितीच्या बाहेरून अशा हालचाली होणे दुर्दैवी आहे. ३ ऑक्टोबर रोजी नवी मुंबईत समितीची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात

### कृती समितीचे काम योग्य दिशेने, खोडा घालण्याचा प्रयत्न करू नये!

आली आहे. त्या बैठकीतच पुढील वाटचालीचा निर्णय घेतला जाणार आहे. समितीचा एकमुखी निर्णय हाच आमचा मार्ग असेल आणि भूमिपुत्रांच्या इच्छेनुसारच आम्ही पुढे पाऊल टाकू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे याकरिता लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीची स्थापना करण्यात आली आणि ही समिती सन २०२०पासून ‘दिबां’च्या नावासाठी सतत प्रयत्नशील आहे. या समितीमध्ये सर्वपक्षीय नेतेमंडळींचा समावेश आहे. या समितीच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांत अनेक आंदोलने करण्यात आली. भव्य मानवी साखळी आंदोलन, एक लाख भूमिपुत्रांचा सिडको घेराव आंदोलन, गावागावात मशाल मोर्चे, भूमिपुत्र परिषद, गावोगावी बैठका आणि त्यामधून जनजागृती असा लढा उभारण्यात आला. एकंदरीत पाच वर्षांत शंभरहून अधिक बैठका होऊन आम्ही हे सर्व मार्गी लावले आहे. त्यामधून आम्हाला मोठ्या स्तरावर ‘दिबां’च्या नावाचे आश्वासन मिळाले. पूर्वीच्या सरकारने शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा ठराव केला होता, पण आमच्या समितीने लढा करून तो ठराव बदलायला लावला. ते सरकार अल्पमतात आल्याने त्यांनी शेवटच्या दिवशी जाता जाता ठरावाची घोषणा केली, मात्र त्यानंतर आलेल्या आणि विद्यमान महायुतीच्या सरकारने विधानसभा आणि विधान परिषदेत ‘दिबां’च्या नावाचा ठराव मंजूर करून केंद्र सरकारकडे पाठवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जेव्हा खारघरला कार्यक्रमानिमित्त आले होते, त्या वेळी त्यांनी या विमानतळावरून विमानाचे टेक ऑफ होईल तेव्हा ’दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळावर तुमचे हार्दिक स्वागत असो’ अशी घोषणा होईल, असे जाहीर केले आहे. **(पान ७ वर..)**

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रयत्न

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अतिवृष्टीमुळे ६० लाख हेक्टरचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ऑगस्टपर्यंत जे नुकसान झाले होते त्यासाठी राज्य सरकारने दोन हजार २१५ कोटी रुपये वितरित करणे सुरू केले आहे. आतापर्यंत ज्या ज्या प्रकारचे नुकसान झाले आहे त्याबाबत सामूहिक धोरण तयार करू आणि पुढच्या आठवड्यात मदतीची घोषणा करू. ही सर्व मदत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यात मिळावी असा राज्य सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, गेल्या काही महिन्यात सातत्याने महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले त्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत आम्ही आढावा घेतला. जवळपास ६० लाख हेक्टरचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यात ऑगस्टपर्यंत जे नुकसान झाले त्यासाठी दोन हजार २१५ कोटी रुपये राज्य सरकारने वितरीत करणे सुरू केले आहे. ई-केवायसीची अट रद्द करून शेत नोंदीप्रमाणेच ही मदत होईल. पुढच्या दोन-तीन दिवसांत सगळ्या प्रकारची माहिती आमच्याकडे पोहचेल. काही ठिकाणी पाणी असल्याने योग्य आकडेवारी घेता येत नव्हती. तिथे आपण अधिकचा वेळ दिला आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना करावयाची मदत, जमीन खरडून गेलेली असेल त्याकरिता मदत, विहिरींसाठी मदत, घरांची मदत असेल अशा वेगवेगळ्या नुकसानीबाबत सर्वसमावेशक धोरण आखून आम्ही मदत करणार आहोत.

सगळी मदत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी खात्यात मिळाली पाहिजे असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. सातत्याने ओला दुष्काळाची मागणी होते, परंतु धोरणात कुठेही ओला दुष्काळाचा उल्लेख नाही. आजपर्यंत कधी ओला दुष्काळ जाहीर झाला नाही, मात्र ज्या वेळी दुष्काळ पडतो तेव्हा ज्या ज्या उपाययोजना आणि सवलती आपण देतो त्या सगळ्या सवलती या वेळी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. नुकसानाची आकडेवारी जमा झाल्यानंतर लवकरात लवकर याबाबत मदतीची घोषणा करू, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दिल्लीतून आपल्याला पूर्ण मदत होणार आहे. त्यासाठी प्रस्ताव पाठवावा लागणार आहे, परंतु दिल्लीच्या मदतीची वाट न पाहता लागेल ती मदत आपण देतोय. त्याची भरपाई दिल्लीतून नंतर केली जाईल. केंद्रास वारंवार पाठवता येत नाही. त्यामुळे संपूर्ण नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर एक प्रस्ताव पाठवला जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### पाकिस्तानमध्ये आत्मघाती हल्ला; १० ठार, ३२हून अधिक जखमी

**इस्लामाबाद** : पाकिस्तानच्या अशांत बलुचिस्तान प्रांताची राजधानी क्वेट्टा येथे मंगळवारी (दि. ३०) दुपारी आत्मघाती हल्ला झाला. फ्रंटियर कॉर्प्स मुख्यालयाजवळ एका आत्मघाती हल्लेखोराने स्वतःला स्फोटकांनी उडवून दिले. यात १० जणांचा मृत्यू झाला असून ३२पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. मृतांची संख्या आणखी वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

### ‘आय लव्ह मुहम्मद’ बॅनर हिंसेप्रकरणी मौलानाला अटक

**कानपूर** : उत्तर प्रदेशमधील कानपूरमध्ये बारावफात (ईद मिलाद-उन-नबी)निमित्त आय लव्ह मुहम्मदचे बॅनर लावल्यावरून वाद निर्माण झाला होता. त्यानंतर अनेक ठिकाणी हिंसाचार झाला. या प्रकरणी स्थानिक धर्मगुरू आणि इत्तेहाद-ए-मिल्लत कौन्सिल (आयएमसी) चे अध्यक्ष मौलाना तौकीर रझा खान यांना इतर आरोपींसह अटक करण्यात आली असून १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

## चौक येथे वडापावमध्ये पाल; हॉटेल पाडले बंद



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वडापाव खाताना ग्राहकाला पाल आढळल्याने चौक गावात एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी हॉटेल बंद पाडले.

चौक बाजारपेठेतील उजाला हॉटेलमध्ये सोमवारी (दि. २९) नाश्ता करण्यासाठी भरत वाघ गेले होते. या वेळी वडापाव खाताना त्यांना तोंडात काहीतरी वेगळे जाणवल्याने वडा कुस्करून पाहिला असता पूर्ण वाढ झालेली पाल मृतावस्थेत आढळून आली. या घटनेनंतर तेथील ग्राहकांनी हॉटेलमालकाला जाब विचारला असता उडवाउडवीची उत्तरे मिळाली. त्यामुळे ग्राहकांनी संताप व्यक्त केला.

दरम्यान, ही घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरल्यानंतर जागरूक ग्रामस्थांनी हॉटेलमालकाला त्याचे हॉटेल बंद पाडण्यास भाग पाडले. याअगोदरदेखील येथील हॉटेलमधील खाद्यपदार्थांत झुरळ आढळले होते. आता पाल आढळल्याने अन्न प्रशासन विभागाकडे तक्रार करणार असल्याचे चौक येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश गावडे यांनी सांगितले.

## मंत्रिमंडळ बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालीमंगळवारी (दि.३०) झाली. या बैठकीत आरोग्य, उद्योग, ऊर्जा आणि प्रशासकीय क्षेत्रात मोठे आणि दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्याच्या विकासाला आणि नागरिकांच्या कल्याणाला गती देण्याचा या निर्णयांचा उद्देश आहे. आजच्या मंत्रिमंडळत बैठकीत झालेले निर्णय सर्व सामान्यांना डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आल्याचे या वेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने कर्करोग उपचारासाठी सर्वसमावेशक धोरण निश्चित केले आहे. या धोरणामुळे नागरिकांना कर्करोगावर दर्जेदार उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा निश्चित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, राज्यभरातील १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध होतील. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अ‍ॅण्ड एज्युकेशन फाऊंडेशन ही कंपनी स्थापन होणार आहे. त्यासाठी भागभांडवलाकरिता १०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

उद्योग विभागाने महाराष्ट्राचे जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ मंजूर केले आहे. ’विकसित भारत २०४७’च्या वाटचालीस सुसंगत अशी वाटचाल व्हावी यासाठी हे धोरण महत्त्वाचे ठरणार आहे. या धोरणामुळे राज्यात गुंतवणूक आणि बहुराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन मिळणार आहे.

ऊर्जा विभागाने औद्योगिक, वाणिज्यिक आणि इतर वर्गवारीतील ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारण्यास मंजुरी दिली आहे. या अतिरिक्त करातून जमा होणारा निधी प्रधानमंत्री कुसुम घटक-ब आणि अन्य योजनांअंतर्गत सौर कृषीपंपासाठी वीज पुरवठा करण्याकरिता वापरला जाईल.

नियोजन विभागाने ’महाजिओटेक महामंडळ’ स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. भू-स्थानिक तंत्रज्ञान वापरून प्रशासनात गतिमानता आणणे हा या महामंडळाच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे. यामुळे विविध क्षेत्रांत धोरणात्मक नियोजन करण्यास आणि निर्णय घेण्यास मदत होईल तसेच विधी व न्याय विभागाने सातारा जिल्ह्यात फलटण येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यासाठी आवश्यक खर्चास मंजुरी दिली. मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या विविध निणर्यांमुळे संबंधित विभाग आणि घटकांना दिलासा मिळणार आहे.

## यंदाचा पाऊस शंभर वर्षांतील सर्वात वेगळा

### मान्सून हंगामातील सरासरीत मराठवाडाच अव्वल

**पुणे : प्रतिनिधी**

यंदाचा मान्सून हंगाम गत शंभर वर्षांतील सर्वात वेगळा ठरला आहे. कमी पर्जन्यमानाचा भाग म्हणून ओळखला जाणारा अवघा मराठवाडा अतिवृष्टीने जलमय झाला असून जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या सरासरीत राज्यात अव्वल ठरला आहे. राज्यात सरासरी २० टक्के अधिक पाऊस झाला. मराठवाडा, विदर्भात १५, तर मध्य महाराष्ट्रात २० टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे.

या वर्षी मराठवाड्यात जास्त पाऊस होणार असल्याचा अंदाज १५ एप्रिल रोजी हवामान विभागाच्या दिल्ली मुख्यालयाने दिला होता, तो तंतोतंत खरा ठरला, मात्र त्यात धोक्याची सूचना महिनावार प्रादेशिक हवामान केंद्र देण्यात अपयशी ठरली. गेल्या शंभर वर्षात यंदा मराठवाड्यात मान्सून हा सर्वात वेगळा ठरला. कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भाला चार महिन्यांच्या सरासरीत मराठवाड्याने मागे टाकत ३९ टक्के जास्त पावसाची नोंद केली.

मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ६३ टक्के, तर त्यापाठोपाठ नांदेड ५० टक्के, बीड ४५ टक्के इतका पाऊस झाला आहे. दरवर्षीची सरासरी ६३९ मिमीची असली तरीही यंदा ३९ टक्के अधिक म्हणजे तब्बल ८९० मिमी पाऊस झाला आहे.

राज्यात सर्वात कमी पावसाचा एकच जिल्हा सांगली असून तेथे उणे २० टक्के पाऊस झाला आहे. गत पाच वर्षांपासून सांगली जिल्ह्यात कमी पाऊस पडत आहे. त्यापाठोपाठ अकोला (उणे ४), अमरावती (उणे ८) टक्के इतका कमी पाऊस झाला आहे, पण राज्यात यंदा एकही जिल्हा अवर्षणग्रस्त ठरला नाही.



## थेरोंडा खंडेरावपाडा समुद्र किनारी मृतदेह

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थेरोंडा खंडेरावपाडा येथील समुद्र किनारी ४० वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह वाहून आला आहे. रेवदंडा पोलिसांनी याची दखल घेत पंचनामा केला असून हा मृतदेह कुणाचा आहे याचा तपास सुरू केलाय.

मृतदेह अरबी समुद्राच्या लाटांबरोबर वाहत येऊन थेरोंडा खंडेरावपाडा समुद्र किनाऱ्यावर आला असण्याची शक्यता स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली. हा मृतदेह बराच काळ समुद्राच्या पाण्यात असल्याने जलचरांनी कुरतडला असून कुजलेल्या अवस्थेत आहे. विशेषतः मृतदेहाच्या चेहरा व डोक्याचे मांस संपूर्णपणे नष्ट झाले आहे. या व्यक्तीचे अंदाजे वय ४०, उंची सुमारे १६० सेमी असून अंगात हिरव्या रंगाचा टी-शर्ट व अंडरवेअर आहे.

या संदर्भात रेवदंडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे. या व्यक्तीबाबत कुणाला काही माहिती असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन रेवदंडा पोलिसांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**पनवेल** : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८वी जयंती संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी साजरी करण्यात आली. या वेळी ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. (वृत्त पान ६ वर..)

## संपादकीय

# बळीराजाला आधार

गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात सातत्याने अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस ही संकटे मोठे नुकसान करताना दिसतात. यंदाच्या अतिवृष्टीमुळे तर पुढील हंगामातही बी-बियाण्याचा व अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होईल की काय अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच निव्वळ शेतकरीच नव्हे तर सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीनेही हे संकट मोठेच आहे.

**राज्यातील महायुती सरकार अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्व निकष बाजूला ठेवून सरसकट मदत करणार आहे. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, बीड, अहिल्यानगर, परभणी, नांदेड, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि जळगाव तसेच सोलापूरमधील शेतकरी या आपत्तीमुळे संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी २ हजार २०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता मंजूर करून तातडीचा दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दिवाळीपूर्वी सर्व शेतकऱ्यांना मदत मिळेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे राज्यभरातील सुमारे ५० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. विशेषत: तूर, उडीद या डाळी, सोयाबिन, भुईमूग आणि कापूस ही पिके भुईसपाट झाली आहेत. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोणतेही अधिकचे निकष न लावता आणि आवश्यकता असेल तिथे निकष शिथिल करून सरकारला शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवायची आहे. निधीच्या वाटपाला सुरूवातही झाली आहे. यासंदर्भात राज्य सरकारने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. यापुढे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सर्वसाधारण निधीचा उपयोग टंचाईसह अतिवृष्टी, पूरस्थिती व गारपीट या संकटातही करता येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीतील मदतीकरिता राज्य सरकारच्या मंजुरीची प्रतीक्षा आता जिल्हाधिकाऱ्यांना करावी लागणार नाही. एकूण जिल्हा वार्षिक निधीच्या पाच टक्क्यांपर्यंत खर्च करण्याची मुभा असणार आहे. याआधी फक्त टंचाईसाठी हा निधी वापरण्याची मुभा होती. आज छोट्या शेतकऱ्यांची स्थिती सर्वात वाईट आहे. शेतीचा वाढता खर्च, नैसर्गिक संकटांचा फटका आणि शेतमालाला मिळणारा बाजारभाव यातून शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत चाललेला दिसतो. वरचेवर येणारी नैसर्गिक संकटे यापुढे केवळ शेती व शेतकऱ्यांची समस्या असणार नाही याचे भान आपल्याला सगळ्यांनाच जितक्या लवकर येईल तितके बरे. नैसर्गिक आपत्तींमुळे कृषी उत्पादनांवर होणार परिणाम भविष्यात आपली अन्नसुरक्षा धोक्यात आणू शकतो. भारत हा आजही कृषीप्रधान देशच आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रावरील संकट हे भारतीय अर्थव्यवस्थेला अडचणीत आणणारे असू शकते. त्यामुळेच हवामान बदलांतून उद्भवलेल्या या नैसर्गिक आपत्तींकडे आपण अधिक गांभीर्याने आणि व्यापक दृष्टिकोनातून बघण्याची गरज आहे. म्हणजेच अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या तातडीच्या उपाययोजना करतानाच दीर्घकालीन विचार होण्याचीही गरज आहे. आजचे संकट हे केवळ एका हंगामापुरते मर्यादित नाही याचे भान आपल्याला यायला हवे आहे. भविष्यातील दीर्घकालीन आव्हानांची ही सुरुवात आहे याकडे तज्ज्ञ लक्ष वेधत आहेत. हवामान बदलामुळे येत्या पाच-दहा वर्षांत कृषी उत्पादनांमध्ये जवळपास १५ ते २० टक्क्यांची घट होऊ शकेल असा इशारा काही अभ्यास अहवालांतून यापूर्वीच देण्यात आला आहे. यापुढे शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या परिणामांना नीट समजून घेऊन त्याला साजेशा कृषिपद्धती स्वीकाराव्या लागणार आहेत. या आव्हानाला तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देतानाच त्यांची या संदर्भातील जागरुकताही वाढवण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची खरेदीशक्ती कमी होणे संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकते.**

# सुधागड किल्ल्यावर विराजमान भोराई देवी



छत्रपती शिवाजी महाराजांचा पदस्पर्श लाभलेल्या ऐतिहासिक सुधागड किल्ल्यावर विराजमान असलेली श्री भोराई देवी ही तालुक्यासह महाराष्ट्रातील अनेकांचे श्रद्धास्थान आहे. अश्विन नवरात्रात देवीच्या दर्शनासाठी किल्ल्यावर असंख्य भाविक येतात. श्रावणातदेखील देवीच्या दर्शनाला काही प्रमाणात भाविक येतात, तर नवरात्रात येथे भाविकांची उदंड गर्दी पहायला मिळते व त्यांच्या उत्साहाला उधाण येते.

आजही श्री भोराई देवस्थान मंडळाचे विश्वस्त गडावर नवरात्र उत्सव पूर्वापार पद्धतीने साजरा करण्याचा प्रयत्न करत आहेत. नवरात्रोत्सवात मंदिरात सकाळी पूजा, अभिषेक, सायंकाळी आरती, रात्री कीर्तन असा कार्यक्रम असतो. अष्टमीच्या दिवशी गडकऱ्यांना मानाप्रमाणे नारळ व मानाचे विडे दिले जातात. शिलंगणाचे दिवशी पालखी निघते. नवरात्रात हजारो भाविकांना प्रसादाचा लाभ दिला जातो.

सुधागड किल्ल्यावर प्राचीन काळातील श्री भोराई देवीचे मंदिर आहे. या देवीची स्थापना भृगु ऋषींनी केलेली आहे असे म्हटले जाते. म्हणून या देवीला 'भृगूअंबा, भोरांबा, भोराई' अशीही नावे आहेत. देवीची मूर्ती तीन फुट उंचीची आहे. मूळ चंडीकेचे स्वरुप असणारी भोराई चतुर्भुज असून हातात त्रिशूळ, खड्ग-खेटक आणि दोन हातात आसूड आहे. देवीच्या पुरातन मंदिराची भोरच्या पंतसचिवांनी पुनर्बांधणी केली व याच देवीला त्यांनी आपली कुलस्वामिनी म्हणून मानले.

पंतसचिव चिमणाजी रघुनाथ उर्फ नानासाहेबांनी पुत्रप्राप्ती झाल्यानंतर येथे १० दिवसांच्या आश्विन नवरात्र उत्सवास सुरुवात झाली. त्या काळात उत्सव साजरा करण्याची जबाबदारी तालुक्याचे मामलेदार यांच्यावर होती.

घटस्थापनेपासून देवीच्या दर्शनासाठी सुधागड किल्ल्यावर मोठ्या प्रमाणात भाविक येण्यास सुरुवात होते. त्यामुळे येथील परिसर भक्तिमय व उत्साही बनतो. देवीच्या दर्शनासाठी किल्यावर येणारे भाविक आजुबाजूचा गर्द झाडीने नटलेला मनोहारी परिसर, वाहते धबधबे, नद्या, डोगररांगा, थंड हवा यांचाही आनंद लुटत असतात. शिवाय या ऐतिहासिक महत्त्वाच्या किल्ल्यावरील विविध ऐतिहासिक वस्तूंना भेट देतात. त्यामुळे त्यांना तिहेरी पर्यटनाचा आंनद मिळतो.

**-धम्मशील सावंत, पाली**

# कळंबोलीची कुलस्वामिनी जय तुळजाभवानी माता

कळंबोली शहरात अनेक प्रसिद्ध असणारी देवी-देवतांची मंदिरे आहेत. असेच एक कळंबोली सेक्टर १ येथील प्रसिद्ध असे जय तुळजाभवानी मातेचे मंदिर आहे. भक्तांच्या हाकेला धावणारी व नवसाला पावणारी देवी म्हणून भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जय तुळजाभवानी मातेच्या नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे.

१९९७मध्ये स्थापन करण्यात आलेल्या तुळजाभवानी देवीच्या साध्या असणाऱ्या मंदिराचा जीर्णोद्धार करून आरसीसी पध्दतीने सुंदर नक्षीकाम केलेले मंदिर उभारण्यात आले आहे. मंदिराच्या मध्येभागी संगमरवरी प्रभावळरूपी चौथरा तयार करून त्यावर देवीची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. येथील प्रथेनुसार मंदिरातील मूर्तीच्या दैनंदिन पूजा-अर्चेचा मान सेक्टर १मधील भाविकांना प्रत्येक दिवशी देण्यात येतो. देवीची दररोज सांजवेळी आरती होते. विविध सण-उत्सवाच्या निमित्ताने देवीची उपासना केली जाते. नवसाला पावणारी देवी असल्याने इथे नेहमीच भक्तांची गर्दी दिसून येते. मांगल्याचे प्रतिक असलेला नवरात्र उत्सव येथे दिमाखदारपणे साजरा केला जातो.

नऊ दिवस येथे जय तुळजाभवानी माता सामाजिक संस्थेच्या वतीने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. नवसाला पावणाऱ्या देवीच्या लौकिकामुळे भाविकांची खण-नारळ, साडी-चोळीने देवीची ओटी भरण्यासाठी नऊ दिवस गर्दी उसळते. नवरात्रातीत येथे आजूबाजूच्या भजन मंडळांकडून देवीचा जागर केला जातो. मंडळाची धुरा मंडळातील सर्वच सभासद समर्थपणे पेलत आहेत. या उत्सवादरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मागील २८ वर्षापासुन अविरत सुरू असलेले रक्तदान शिबिर जय तुळजाभवानी



संस्था व एमजीएम हॉस्पिटल कामोठे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येते. यंदा शिबिरात एकूण ११५ रक्तदात्यांनी रक्तदान करुन आपले कर्तव्य निभावले आणि संस्थेस मोलाचे सहकार्य केले. या रक्तदात्यांचा संस्थेकडून प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला

लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, संगीत खुर्ची, गीत गायन स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा आदी प्रकारच्या स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धा आयोजित करण्यामागे लहान मुलांसह तरुणाईच्या कलागुणांना वाव देणे हा उद्देश असतो. दरवर्षी नित्यनियमाने देवीच्या भव्य अशा महाप्रसादाचे आयोजन दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मंदिराच्या सभामंडपात केले जाते. परिसरातील अंदाजे दहा हजारांहून अधिक भक्तजण या महाप्रसादाचा लाभ घेतात. यासाठी संस्था, मंडळाचे वरिष्ठ सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सभासद मेहनत घेतात

नऊ दिवस विनातक्रार आपापली नोकरी-धंदा सांभाळून ही सर्व मंडळी उत्सव यशस्वी करण्यासाठी झटत आहेत. सेक्टर १ मधील रहिवासी महिला मंडळाचीही त्यांना तेवढीच साथ लाभत आहे. नवरात्रात नऊ दिवस सकाळी ९ वाजल्यापासून दर्शन व देवीची ओटी भरण्याचा कार्यक्रम सुरू होतो. देवीला नऊ दिवस सजविण्याचे काम मंदिरातील श्री. केशव कुलकर्णी आणि महिला मंडळ हौसेने करीत असतात. विजयादशमीच्या दिवशी सोने लुटणे हा सोहळा उत्साहात साजरा केला जातो. त्यानंतर रात्री नऊ दिवस आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात येते. त्यानंतर या उत्सवाची सांगता होते.

भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम असणाऱ्या या उत्सवाची धामधूम सुरू असून आदिशक्तीच्या उत्सवाचा उत्साह शिगेला पोहचला आहे. सध्याच्या आधुनिकतेच्या युगात व तरुणाईचे आकर्षण असलेल्या डिस्को दांडियाच्या काळातही येथील नवरात्रोत्सव आपले वेगळेपण टिकवून आहे. नवरात्र उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी संस्थेचे सर्व लहान-मोठे-वरिष्ठ सदस्य, महिला सदस्य आणि भक्तगण असे सर्वच अहोरात्र परिश्रम घेत आहेत.


**-दीपक घोसाळकर, कळंबोली**



## बदलते तंत्रज्ञान

# सायबर फसवणुकीवर आता एआयचा लगाम!

देशात सायबर फसवणुकीचे नवनवे प्रकार समोर येत असतानाच केंद्र सरकारने आता यावर नियंत्रण आणण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तयारी केली आहे. यासाठी डिजिटल प्री-ऑब्झर्वेशन प्लॅटफॉर्म तयार केला जाणार असून तो फसवणुकीच्या वेळी तत्काळ किंवा प्री-ऑब्झर्व मोडमध्ये अलर्ट जारी करेल.



फसवणुकीत वापरलेला मोबाइल नंबर ताबडतोब बंद करण्यासाठी एआय-आधारित मॉनिटरिंग सिस्टीम कार्यरत होणार आहे. सध्या ही प्रक्रिया करण्यासाठी बराच वेळ जातो.

२२ लाखांहून अधिक सायबर फसवणुकीचे प्रकार गेल्या वर्षभरात देशात नोंदवले गेले.

२.८४ कोटी रुपयांची फसवणूक थेट मोबाइल नंबरद्वारे झाली.

१.२ लाख कोटी रुपयांची सायबर फसवणूक २०२५ मध्ये होऊ शकते, असा तज्ज्ञांचा अंदाज.

### प्री-डेटा नालिसिससाठी रोडमॅप

नवीन प्लॅटफॉर्ममुळे फसवणुकीत वापरलेल्या मोबाइलची माहिती थेट सायबर इंटेलिजन्स, बँकिंग आणि दूरसंचार विभागांपर्यंत पोहचेल आणि संबंधित नंबर किंवा आयपी ड्रेस त्वरित बंद करता येईल. गृह मंत्रालयाच्या सायबर व इंटेलिजन्स विभाग, वित्त मंत्रालयाच्या बँकिंग क्षेत्र व दूरसंचार मंत्रालय यांच्यात प्री-डेटा नालिसिससाठी रोडमॅप तयार केला जात आहे.

### प्री-अलर्ट प्रणालीची तयारी

तिन्ही यंत्रणांच्या पातळीवर संशयास्पद सर्व्हर किंवा मोबाइल सिमबाबत आधीच प्री-अलर्ट प्रणाली तयार केली जाणार आहे. यामुळे वेळेत कारवाई करून फसवणूक रोखणे शक्य होईल. आतापर्यंत केवळ संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवले जात होते.

आता खाते उघडण्यासाठी वापरलेले नंबर किंवा सर्व्हर फसवणुकीच्या आधीच प्री-ऑब्झर्वेशनमध्ये आणता येतील. आर्थिक गैरव्यवहारासाठी वापरले जाणारे वापरले जाणारे मोबाइल नंबर आता आधीच निरीक्षणाखाली ठेवता येतील. अशा प्रकारे सायबर फसवणुकीवर आता एआयचा लगाम लागणार असून मोबाइल नंबर व आयपी ड्रेस ब्लॉक होतील.

# थोर साहित्यिक ग.दि. माडगूळकर

गजानन दिगंबर माडगूळकर म्हणजेच आपले सर्वांचे ओळखीचे गदिमा. त्यांचा जन्म सांगली शेटफळे येथे १ ऑक्टोबर १९१९ रोजी झाला. यांच्या वडिलांचे नाव दिगंबर बळवंत माडगूळकर आणि आईचे नाव बनुताई दिगंबर माडगूळकर होते.

'गदिमां'चे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. त्यांच्या घराची परिस्थिती बेताची होती. त्यामुळे त्यांना चरितार्थासाठी चित्रपट व्यवसायात यावे लागले. त्यांच्या नक्कल करण्याच्या आणि लिखाणाच्या आवडीमुळे त्या कलेचा येथे चांगलाच उपयोग झाला.

हंस पिक्चर्स चित्र संस्थेच्या 'ब्रह्मचारी' (१९३८)मध्ये गदिमा यांनी छोटी भूमिका साकारून आपल्या चित्रपटातील कारकीर्दीचा शुभारंभ केला. लेखनिक म्हणूनही त्यांनी कार्य केले. सुप्रसिद्ध साहित्यकार वि.स. खांडेकरांचे ते लेखनिक होते. त्यांच्याच पुस्तक संग्रहालयात त्यांना अनेक पुस्तके वाचायला मिळाली. त्यामुळे लिखाणाला वेग आला. नवयुग चित्रसंस्थेत के. नारायण काळे यांच्या हाताखाली सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले.

आचार्य अत्रे यांचा प्रासादिक गीतरचनेचा आदर्श त्यांच्यासमोर होता. गदिमांनी भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटाची गीते लिहिली.



## निमित्त

त्यांना लोकशाहीर रामजोशी चित्रपटात कथा संवाद आणि गीते लिहिण्याची तसेच एक छोटी भूमिका करण्याची संधी मिळाल्याने त्यांनी चित्रपटसृष्टीत आपला ठसा उमटवला आणि ते मराठी सिनेसृष्टीचा भक्कम आधार बनले.

कवी आणि लेखकाच्या नात्याने गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्यासारख्या संतांचे सखोल संस्कार झाले होते. त्यांच्या कवितेवर मराठमोळेपणाचे संस्कार दिसतात. गदिमा आधुनिक काळातील मराठी भाषेतील अग्रगण्य साहित्यिक होते.


अनेक समरगीते, बालगीते त्यांनी लिहिली. त्यांनी लिहिलेल्या गीत रामायणाने तर मराठमोळ्या प्रेक्षकांना अक्षरश: वेडच लावले. सर्वत्र त्यांची किर्ती पसरली. ते भावकवीसुद्धा होते. त्यांचा काव्यावर संत काव्य आणि शाहिरी अशा दोन्ही काव्यांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी अनेक लावण्या आणि चित्रपटगीते लिहिली आहेत, जी आजही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या गीतरामायणाच्या गायनाचे शेकडो कार्यक्रम झाले व अजूनही अनेक कलाकार सादर करीत असतात. विशेष म्हणजे अनेक भारतीय भाषांमध्ये त्याचे अनुवाद केले गेले.

'गदिमां'चे काही गाजलेले चित्रपट म्हणजे पुढचं पाऊल, बाळा जो जो रे, लाखाची गोष्ट, जगाच्या पाठीवर, संथ वाहते कृष्णामाई, मराठी चित्रपट तसेच तुफान और दिया, दो आँखे बारह हाथ, गुंज उठी शहनाई अशा हिंदी चित्रपटांतही त्यांनी लिखाण केले आहे.

भारत सरकाराने पद्मश्री पुरस्कार देऊन गदिमांचा सन्मान केला. १९७३ साली त्यांना मराठी साहित्य संमेलन यवतमाळचे अध्यक्षपद देण्यात आले. महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ सदस्य संगीत नाटक अकादमी व विष्णूदास भावे सुवर्णपदक पुरस्कारानेही ते सन्मानित झाले. १४ डिसेंबर १९७७ रोजी पुणे येथे गदिमांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# ग्लासभर बडीशेपचं पाणी देते शरीराला नवी एनर्जी

जेवणानंतर बडीशेप खाण्याची सवय अनेकांना असते. काही जण त्याला व्यसनच समजतात, तर काही म्हणतात रोज कशाला खायची? खरेतर रोज जेवणानंतर साधी बडीशेप खाणे आरोग्यासाठी चांगले ठरते. बडीशेप ही आपल्या स्वयंपाकघरात सहज मिळणारी असली तरी ती अत्यंत उपयुक्त आहे. तिच्या सुगंधामुळे आणि गोडसर चवीमुळे ती विविध मसाल्यांमध्ये वापरली जाते, शिवाय तिचे औषधी गुणधर्मही तितकेच महत्त्वाचे आहेत.



बडीशेपेत कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, झिंक, जीवनसत्त्व ए असते. एवढेच नाही तर जीवनसत्त्व सी आणि बी सारखी इतरही अनेक जीवनसत्वे असतात. याशिवाय त्यात फायबर, प्रथिने आणि आवश्यक अँटी ऑक्सिडंट्सही असतात, जे शरीराच्या मजबूतीसाठी उपयुक्त ठरतात. बडीशेप भाजून खा तसचे जेवणात वापरा, पण बडीशेपेचे पाणी पिणे हा एक साधा आणि परिणामकारक उपाय आहे. हे पाणी अनेक आरोग्य समस्यांवर नैसर्गिक औषधासारखे कार्य करते.

बडीशेपेचे पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. पचायला जरा जड असलेले अन्न खाल्ल्यानंतर पोटात होणारे गॅस किंवा अपचन कमी करण्यासाठी हे पाणी उपयुक्त ठरते. शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यासाठी ते मदत करते आणि त्यामुळे त्वचेचा निखार वाढतो. यामध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स शरीरातील पेशींचे संरक्षण करतात. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. बडीशेप थंड प्रवृत्तीची असल्यामुळे तिचे पाणी पोटाला आणि शरीराला गारवा देऊन उष्माघातापासून संरक्षण करते. महिलांसाठी हे विशेष फायदेशीर मानले जाते कारण मासिक पाळीतील वेदना कमी करण्यात आणि हार्मोन्स संतुलित ठेवण्यात त्याचा उपयोग होतो. तसेच लोह आणि इतर खनिजांमुळे रक्तवाढीस मदत होते.

नियमित बडीशेपेचे पाणी प्यायल्याने वजन कमी करण्यात मदत होते. कारण ते भूक नियंत्रित ठेवते आणि मेटाबॉलिझम वाढवते. याशिवाय रक्तदाब संतुलित ठेवण्यात आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यातही त्याचा उपयोग होतो. डोळ्यांच्या आरोग्यासाठी जीवनसत्त्व ए उपयुक्त असून ते दृष्टीसाठी चांगले ठरते. इतक्या विविध पोषक गुणधर्मांमुळे बडीशेपेचे पाणी हे नैसर्गिक टॉनिक मानले जाते. रोज सकाळी किंवा रात्री झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात भिजवून ठेवायचे. काही तासांनी बडीशेपेचे पाणी प्यायचे. ज्यांना पित्ताचा त्रास होतो त्यांनी तर दिवसातून दोनदा असे पाणी प्यायले तरी चालेल.

# दमदार बरसल्यानंतर वरुणराजाने घेतली उसंत

**श्रीवर्धन : बातमीदार**

पंधरा दिवसांपासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मुसळधार पावसाने थैमान घातले होते. तर श्रीवर्धन परिसरातदेखील जवळजवळ आठवडाभर पाऊस धो धो कोसळत होता. पावसामुळे या ठिकाणचा पर्यटन व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला होता. सतत पडत असलेल्या पावसामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेदेखील मुश्कील झाले होते. त्यातच हिंदू धर्मातील पवित्र असा शारदीय नवरात्रोत्सव सुरू असून या कार्यक्रमांमध्ये कोणालाही जागरण करण्यासाठी पावसाने येऊच दिले नाही, परंतु आता पावसाने उसंत घेतली.

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद

### ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**सप्टेंबर २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुरज सुरेश जोशी | लता सुरेश जोशी | पवल४-१५१२३-२०२५ | ०८/१२/२०२५ | सदनिका क्र.२०२ दुसरा मजला, सी वेग, कार्तिक्यः गार्डन को ऑप. ही सी मौजे पालीदेवद |
| २ | संतोष कुंडलिक माने ज्योती सतोष माने | राजु काशिराम राठोड रंजना राजु राठोड | पवल३-१२१६२-२०२५ | १६/०५/२०२५ | सदनिका क्र.०२, तळ मजला, बि.नं. जी ११. अष्टविनायक को ऑप.हौ.सो.लि. मौजे शिलोतर रायचूर |
| ३ | किसन गणपत शिंदे कविता किसन शिंदे | हेमलता कमलकात राव/ शीतल विश्वनाथ करकेरा | पवल२-१७१५०-२०२५ | १४/०८/२०२५ | सदनिका क.सी ०२, तळ मजला, बिल्डीग नं. २, कार्तिक्या पार्क को. ऑप. हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | सेट्टीयाप्पा कामाक्षीदेवी | मे. जान्हवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा राजू ज्वालाप्रसाद जायमवाला | पवल२-४८८७-२०२२ | ३०/०३/२०२२ | सदनिका न. ३०२, तिसरा मजला, राधकृष्ण कॉम्प्लेक्स मौजे पालीदेवद. |
| ५ | सोमनथ महादेव भिगोरे/ शिवलीला सोमनाथ भिंगोरे | शशी भुषण सिंह/निलू शशी भुषण सिंह | पवल२-६४९६-२०२४ | २७/०३/२०२४ | सदनिका क्र.८, तळ मजला, बि.नं. जी. २, वसुंधरा को.ऑप. हौ सो.लि. मौजे शिलोतर रायचूर |
| ६ | वासुदेव शाताराम शेळके | पुष्पा लक्ष्मण केणी | पवल२-९६०९-२०२५ | ०९/०५/२०२५ | सदनिका क्र.३०२, तिसरा मजला, लक्ष्मी आर्केड इमारत.. मौजे पालीदेवद |
| ७ | सुधांशू शंकर सिंग/ विजयालक्ष्मी गौरीशंकर सिंह | प्रकाश रामचंद्र नाळे | पवल१-१३३३-२०२५ | २४/०२/२०२५ | सदनिका क्र. सी १०३, पहीला मजला, सी विंग, साक्षी पार्क टाईप १ सी.एच.एस.लि. मौजे पालीदेवद |
| ८ | हिराबाई भिमराव आलदर/ नवनाथ भिमराव आलदर | निवृत्ती भिमराव आलदर/ हेमा पाडुरंग कोळेकर | पवल१-५६९९-२०२५ | २२/०७/२०२५ | सदनिका न. २०१, बी विंग, बिल्डींग नं. ९. दुसरा मजला, स्वानंदभुमी कॉम्प्लेक्स मौजे पालीदेवद |
| ९ | अमोलकुमार प्रभाकर बोधीराज / मनिषा प्रभाकर गमरे | ज्ञानदिप एकनाथ ठाकुर /विकास एकनाथ ठाकुर | पवल१-४९१३-२०२५ | २६/०६/२०२५ | सदनिका क्र. एफ २०३, बिल्डींग नं. २. दुसरा मजला, स्वर्णभुमी कॉम्प्लेक्स मौजे शिलोत्तर रायचूर |
